# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(Formerly Pune University)

Ganeshkhind, Pune – 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११८८/८९

Telephone : 020-25621188/89

ईमेल / Email : affiliation@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)

Academic Section (Affiliation Unit)

वेबसाइट/Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र. सीए/1434

दिनांक : 10/08/2024

## तातडीचे व महत्वाचे

प्रति,

**मा. प्राचार्य/संचालक,**

सर्व संलंग्नित अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय/

मान्यताप्राप्त परिसंस्था,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**विषय : आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरून महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून बीबीए/बीसीए/बीबीएम/बीएमएस या अभ्यासक्रमांच्या मान्यतेबाबत.**

**संदर्भ :** शासन निर्णय क्र. मान्यता–२०२४/प्र.क्र.२४५/तांशि–४, दि. ०७/०८/२०२४

महोदय/महोदया,

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत **बीबीए/बीसीए/बीबीएम/बीएमएस** या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालय/परिसंस्था तसेच स्वायत्त महाविद्यालय/परिसंस्थांना उपरोक्त शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे

उक्त शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या फक्त अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयासाठी मान्यता देण्याबाबतची प्रक्रिया सध्या सुरू करण्यात येत आहे.

सदर बाब विचारात घेता शासन निर्णयामधील नमूद अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयांनी सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेली कागदपत्रे तपासणीसाठी विद्यापीठाच्या www.unipune.ac.in संकेतस्थळावर BCUD LOGIN>ONLINE SERVICES येथे माहिती भरून आवश्यक कागदपत्रे त्वरीत अपलोड करण्यात यावीत.

कळावे,

10/8/24

उपकुलसचिव

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)

# परिशिष्ट ‘अ’

- **शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठी बीबीए/बीसीए/बीबीएम/बीएमएस या अभ्यासक्रमांच्या पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणाबाबत ऑनलाईन माहिती भरताना खालील कागदपत्रे सोबत जोडणे आवश्यक आहे.**

**१. शासन निर्णयानंतरची राष्ट्रीयकृत बॅकेतील मुदतठेव खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.**

अ) नवीन अभ्यासक्रमाकरीता रूपये ५.०० लाख (प्रत्येकी अभ्यासक्रमाकरीता स्वतंत्र)

ब) नवीन व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयासाठी — रूपये १५.०० लाख

**२. संस्थेच्या लेटरहेड वर बॅकेचे संयुक्त हमीपत्र (संस्थेचा व बॅकेचा सही शिक्का असणे आवश्यक)**

**३. रूपये ५००/— च्या स्टॅम्पपेपरवर नोंदणीकृत हमीपत्राची छायांकीत प्रत ऑनलाईन अपलोड करून मुळ हमीपत्र या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.(सोबत नमुना)**

( संस्थेच्या लेटरहेडवरील संस्थेच्या आणि बँकेच्या संयुक्त हमीपत्राचा नमुना खालीलप्रमाणे)

## संयुक्त हमीपत्र

मी, प्राचार्य/संचालक,..........................................खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून देतो की, या......................महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२४—२५ साठी, नवीन अभ्यासक्रमाचे नाव :—.........................तुकडी वाढ ..................नव्याने सुरू करणेसाठी सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे. सदर नवीन अभ्यासक्रमासाठी लागणारे प्रती अभ्यासक्रम रु....... ........ च्या मुदत ठेवी बँकेच्या खाली नमूद केलेल्या शाखेत ठेवलेल्या असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या पूर्व परवागनी शिवाय सदर मुदत ठेव निधी काढणार नाही.

| अ. क्र. | मुदत ठेव पावती क्र. व दिनांक | बँकेचे नाव | पावतीचा कालावधी | रक्कम |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | |
|---|---|
| प्राचार्य,<br><br>महाविद्यालयाचे नाव | बँकेचे नाव,<br><br>सही व शिक्का |

स्थळ :—

दिनांक :—

**(५०० रु. च्या स्टँप पेपरवरील हमीपत्राचा नमुना खालीलप्रमाणे)**

**हमीपत्र**

आम्ही.....संस्था...........चे........महाविद्यालय.......पत्ता...........खालीलप्रमाणे हमीपत्र लिहून देतो की,

१. महाविद्यालयामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अंतर्गत राबविण्यात येणारा ............ अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांच्या विहित मानका व प्रमाणकानुसार महाविद्यालयात आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली (AICTE) यांच्या विहित मानकानुसार महाविद्यालयामध्ये आवश्यक मान्यताप्रात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी नेमलेले आहे.

४. विद्यापीठाच्या निर्देशानुसार महाविद्यालयामध्ये........ अभ्यासक्रमासाठी............लाख मुदत ठेव बँकेचे नाव..........................., शाखेचे नाव.....................या शाखेत ठेवण्यात आली आहे, विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय सदर ठेव काढणार नाही.

५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद,नवी दिल्ली (AICTE) यांच्या विहित मानका व प्रमाणकानुसार तसेच तंत्रशिक्षण संचालनालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र शासन यांच्या नियमानुसार महाविद्यालयामध्ये नेमलेल्या मान्यताप्रात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार नियमित वेतन देण्यात येईल, अशी मी हमी देतो.

| | |
|---|---|
| प्राचार्य,<br>महाविद्यालयाचे नाव<br>सही व शिक्का | अध्यक्ष / सचिव<br>संस्थेचे नाव<br>सही व शिक्का |

स्थळ :—

दिनांक :—

युनिपुणे आय-डी :—